# महिला पोलीस कर्मचारी अंजना शिंदे यांचा मा.पोलीस अधीक्षक साहेबांच्या हस्ते सत्कार समारंभ...

दिनांक 30.09.2019 रोजी मा. पोलीस अधीक्षक साहेब श्री विजयकुमार मगर यांनी पोलीस अंजना विश्वाबंर शिंदे, नेमणुक पोलीस मुख्यालय, नांदेड यांच्या कलांगुणांना प्रोत्साहन देत पोलीस अधीक्षक कार्यालयात सत्कार करण्यात आला. पोलीस दलातील दैनंदिन कामकाजाची दगदग सांभाळून अंजना शिंदे यांनी स्वीमींग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र च्या वतीने राज्य स्तरीय जलतरण स्पर्धा, जळगाव येथे नुकत्याच पार पडलेल्या जलतरण स्पर्धेमध्ये वैयक्तीक प्रकारात 04 सुवर्ण पदक तर सांघीक (रिले) मध्ये 02 सुवर्ण पदक अशी एकुण 06 सुवर्ण पदकांची लयलुट करून नांदेड पोलीस दलाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. आज मा.पोलीस अधीक्षक श्री विजयकुमार मगर, अप्पर पो.अ. श्री दत्तराम राठोड, पोलीस उप अधीक्षक(गृह) श्री जहरवाल, रापोनि श्री एस.आर.पोकळे, पोनि श्री निकाळजे, पोनि श्री काकडे, जनसंपर्क अधिकारी श्री अण्णासाहेब पवार यांचे उपस्थितीत नांदेड पोलीस दलाच्या वतीने अंजना शिंदे हिचा सत्कार करण्यात आला तसेच पोलीस दलात सर्व स्तरातुन अंजनाचे कौतुक करण्यात येत आहे.

अंजना शिंदे हिने 50 मिटर फ्रि स्टाईल, 100 मिटर ब्रेस्टस्ट्रोक, 50 मिटर बटरफ्लाय, 50 मिटर ब्रेस्टस्ट्रोक मध्ये प्रत्येक सुवर्ण पदक पटकावुन वैयक्तिक 04 सुवर्ण पदकांची कमाई करून महिलांना सोन्याची किती आवड असते हे सिध्द करून दाखवत नांदेड पोलीस दलाचा लौकिक वाढवला आहे. त्यांच्या पुढील राष्ट्रीय जलतरण स्पर्धा हया लखनौ (उत्तर प्रदेश) येथे 18 ते 20 ऑक्टोबंर दरम्यान पार पडणार आहेत. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी व राष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी मा.पोलीस अधीक्षक, श्री मगर साहेबांनी त्यांना भरभरुन शुभेच्छा दिल्या आहेत.

